| MHKO160001552022 | नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०२२ मधील निशानी क्र. ४० वरील आदेश |
|---|---|

०१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये तूर्तातूर्त मनाईचा अर्ज दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीं यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल केला असून सदरचे काम प्रतिवादी क्र.१ व २ विरूध्द तूर्तातूर्त मनाई- नि.५ व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेला मनाई अर्ज नि.३० चे चौकशीवर आहे. यातील मूळ प्रतिवादी क्र. ४ व ८ यांनी नि.२१ वर कैफियत देऊन वादीचा दावा मान्य केला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकत ही वादीचे हक्क डावलण्याचे हेतूने रजिस्टर खरेदीपत्राने विक्री केली असल्याने दाव्यात व मनाई अर्जात वादीने प्रतिवादी क्र. ८ नंतर अर्जात नमूद केलेप्रमाणे प्रतिवादी क्र. ९ ते ११ प्रमाणे पक्षकार करणेत यावी व त्याप्रमाणे दाव्यात व अर्जात दुरूस्ती करण्याबाबत वादींनी विनंती केली आहे. तसेच वादींनी दावेचे सरनामेचा मजकूर संपल्यानंतर रक्कम रू.२,३००/- ऐवजी रू.३,३००/- अशी दुरूस्ती करणेस परवानगी मागितली आहे. दावा मिळकत गट नंबर ८७३ ची तथाकथित विक्री झाल्याने दाव्यातील व मनाई अर्जातील कलम २ मध्ये "शेवटी" अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम १० मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम ११ मध्ये दि.१८/०१/२०२० ऐवजी १८/०१/२०२२ अशी दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम १० मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट

करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम ८ मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम १४ चे तपशीलामध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील कलम १९ मध्ये दावेचे विनंतीमध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी दाव्यातील कलम १२क नंतर क१, तसेच १२डमध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादींनी मनाई अर्जातील कलम ११,१३ मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. अशा प्रकारे वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम २ ते १३ मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. वादी यांनी कथन केले की सदरचे दुरूस्तीमुळे दाव्याचे रचनेत कोणताही बदल होत नाही, तसेच सदरची दुरूस्ती करणे गरजेचे आहे व त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, याउलट, सदरची दुरूस्ती न केलेस वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. सबब वादींनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीं यांनी नि.४३ वरील कॉस्टची रक्कम भरलेली नाही, तसेच आजरोजी प्रतिवादीं अगरतर्फे विद्वान वकिलांचा पुकारा केला असता ते गैरहजर, सबब, त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

०४. मी वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी आणि प्रतिवादी यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला असून सदरचे काम प्रतिवादी क्र.१ व २ विरूध्द तूर्तातूर्त मनाई-नि.५ व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेला मनाई अर्ज नि.३० चे चौकशीवर प्रलंबित आहे. वादींनी कथन केले की सदरचा दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकत ही वादीचे हक्क डावलण्याचे हेतूने रजिस्टर खरेदीपत्राने विक्री केली असल्याने वादींनी दाव्यातील व मनाई अर्जातील कलम २ ते १३

मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा व दुरूस्ती करावी अशी विनंती वादींनी केली आहे. प्रतिवादीं यांनी नि.४३ वरील कॉस्टची रक्कम भरली नसलेने तसेच प्रतिवादीं अगरतर्फे विद्वान वकिल गैरहजर असेलेने त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे. सबब, वादीं यांची सर्व कथने खरी व ग्राह्य समजण्यात येतात. वादी यांचे अर्जाचे स्वरूप पाहता तो मंजूर झाल्यास दाव्याचे मुळ स्वरूपावर कोणताही बदल होणार नाही. वादी यांची दुरूस्ती ही फॉरमल स्वरूपाची असून यामुळे दाव्याचे स्वरूपावर कोणताही परिणाम होणार नाही. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद व गुंतागुंत टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

०१ अर्ज नि.४० मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांना वादपत्रामध्ये व मनाई अर्जामध्ये सदरचे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी सदर नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत व दुरूस्त मनाई प्रत न्यायातयात दाखल करावी.

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2024.02.17 10:55:20 +0530

दिनांक- १३/०२/२०२४

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी